## निशाणी क्र. ५ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहितेच्या ऑर्डर ३९ रूल १ व २ अंतर्गत तात्पुरता मनाई हुकुम मिळणेकरीता दाखल केलेला असुन, वादीने मौजे निंभा येथील गट क्र. ५/२ मधील ०. ६१ आर गट क्र. ३/१ मधील १.५४ आर, गट क्र. ६/१ मधील १. ६६ आर शेतजमीन (वाद मिळकत) प्रतिवादी यांनी इतर कोणत्याही व्यक्तीस प्रस्तुत दाव्याचा निकाल लागेपर्यंत हस्तांतरीत करू नये यासाठी प्रतिवादींविरूद्ध तात्पुरता प्रतिबंधात्मक आदेश मिळणेकरीता दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी नि.क्र. १० प्रमाणे त्यांचे लेखी म्हणणे दाखल करून प्रस्तुतच्या अर्जास प्रखर विरोध केला.

२. वादीचे थोडक्यात कथन असे कि, उपरोक्त वाद मिळकत हि प्रतिवादी क्र. १ यांना वारसाप्रमाणे मिळालेली आहे. प्रतिवादी क्र. १ यांचे संगीता हिच्यासोबत पहिले लग्न झालेले होते. वादी हि संगीता हिची मुलगी आहे. प्रतिवादी क्र. १ ते ३ हे वादीचे वडील, सावत्र आई व सावत्र भाउ आहेत. मुलगी या नात्याने वादीचा वाद मिळकतीत अर्धा हिस्सा आहे. प्रतिवादी क्र. १ यांच्याकडे एकुण २६ एकर शेतजमीन होती. त्यातील उत्पन्न प्रतिवादी क्र. १ हेच घेत होते व अडचण भासल्यास शेतजमीन विकत होते. अशाप्रकारे प्रतिवादी क्र. १ यांनी १६ एकर शेतजमीन विकलेली असुन वादी हिला त्यामध्ये काहीही हिस्सा दिलेला नाही. प्रतिवादी क्र. १ यांनी वाद मिळकत गट क्र. ३ /१ मधील १.५४ आर शेतजमीन प्रतिवादी

क. २ यांच्या नावे केलेली आहे. गट क. ६/१ मधील १.६६ आर शेतजमीन प्रतिवादी क. १ यांनी प्रतिवादी क. ३ याच्या नावे करून दिली. वादीच्या नावे प्रतिवादी क. १ ने काहीही शेतजमीन करून दिलेली नाही. वादीने प्रतिवादींना ०५.०२.२०२१ रोजी नोटीसद्वारे वाटणीची मागणी केली परंतु दिनांक १०.०३.२०२१ रोजी प्रतिवादींनी सदर मागणी फेटाळली.

३. यापुर्वी प्रतिवादींनी १६ एकर जमीन विकलेली आहे. वाद मिळकत सुद्धा प्रतिवादी विकु शकतात. त्यामुळे त्यांना प्रतिबंध करणे आवश्यक आहे. म्हणून वादीने प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

४. प्रतिवादी क. १ ते ३ यांनी निशाणी क. १० नुसार त्यांचे म्हणणे दाखल करून वादीच्या अर्जातील मजकुर अमान्य केला. प्रतिवादींनी पुढे असे कथन केले आहे की, प्रतिवादी क. १ ने पहिली पत्नी व दुसरी पत्नी यांच्या मुलांमध्ये कधीही भेदभाव केला नाही. वादीच्या शिक्षणाचा व लग्नाचा सपुर्ण खर्च प्रतिवादी क. १ ने केलेला आहे. तिच्या लग्नासाठी व शिक्षणासाठी घेतलेले कर्ज फेडण्याकरीता प्रतिवादी क. १ यांनी त्यांच्या पत्नीच्या नावे असलेली २ एकर शेतजमीन विकलेली आहे.

५. प्रतिवादी यांना गट क. ५/२ मधील ०.६१ आर एवढीच शेतजमीन वारसाहक्काने मिळालेली असुन त्यामध्ये प्रतिवादी क. १ हे वादीस तिचा हिस्सा देण्यास तयार आहे. गट क. ३/१ मधील १ हे ५४ आर हि शेतजमीन प्रतिवादी क. २ हिने खरेदीखताद्वारे

विकत घेतलेली आहे. त्यामुळे प्रतिवादी क. २ हि सदर शेतजमीनीची तिच्या मर्जीप्रमाणे विल्हेवाट लावु शकते. तसेच गट क. ६/१ मधील १ हे. ६६ आर. हि शेतजमीन प्रतिवादी क. १ यांना बक्षिस पत्राद्वारे मिळालेली असुन ती शेतजमीन प्रतिवादी क. १ यांनी प्रतिवादी क. ३ यांच्या नावे केलेली आहे. त्यामुळे गट क. ५/२ मधील वाद मिळकतीशिवाय इतर वाद मिळकतीमध्ये वादीचा कोणतही हक्क नाही त्यामुळे वादीच्या हक्कात मनाई हुकुम देता येणार नाही. त्याकरीता प्रतिवादींनी प्रस्तुतचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली.

६. अर्ज, म्हणणे, प्रकरणातील कागदपत्रे आणि दोन्ही बाजुंचे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकुन खालील मुद्दे माझे विचारार्थ निघतात. त्यावर मी कारणांसहित निष्कर्ष त्यापुढे नमुद केले आहेत :

| अनु. क. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | वादी प्रथमदर्शनी केस सिध्द करतात काय ? | अंशतः होकारार्थी. |
| २ | सोसीस्करतेची तुला वादीच्या बाजुने आहे असे वादी सिध्द करतात काय ? | अंशतः होकारार्थी. |
| ३ | मागणी केल्याप्रमाणे तात्पूर्ता मनाई आदेश न दिल्यास वादीचे अपरिमित नुकसान होणार आहे असे वादी सिध्द करतात काय ? | अंशतः होकारार्थी. |
| ४ | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

७. वादीने त्यांचे म्हणणे सिध्द करण्याकरिता अनुक्रमे नि.क. ४ व १४ वरील दस्तऐवज यादी प्रमाणे दाखल केलेल्या

कागदपत्रांचा आधार घेतला. तसेच प्रतिवादी क. १ ते ३ यांनी नि. क. १२ वरील दस्तऐवज यादी प्रमाणे दाखल केलेल्या कागदपत्रांचा आधार घेतला.

**कारणमिमांसा**

**मुद्दा क. १ ते ३ करिता :-**

८. सदर चारही मुद्दे एकमेकांशी संलग्न असल्याने विवेचनाची पुनरावृत्ती टाळण्याकरिता मी ते एकत्रित विचारार्थ घेत आहे. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. दावा, अर्ज, गैरअर्जदाराचे म्हणणे व दोन्ही पक्षांतर्फे सादर करण्यात आलेली कागदपत्रे यांचे अवलोकन केले.

९. प्रस्तूतचा दावा हा वाद मिळकतीची वाटणी, ताबा व कायमच्या मनाई हूकूम मिळणेकरिता दाखल केलेला आहे. वादीचा दावा व प्रस्तुतच्या अर्जातील मागणी यांचा विचार करता, प्रथमदर्शनी बाजु म्हणुन वादीने वाद मिळकतीमध्ये तिचा प्रथमदर्शनी हक्क आहे हि बाब सिध्द करणे आवश्यक आहे.

१०. वादीच्या कथनाप्रमाणे वाद मिळकत हि वादी व प्रतिवादी यांची वडीलोपार्जित वारसानुसार आलेली शेतजमीन आहे. सदर कथन सिध्द करण्याकरीता वादीने गट क. ५/२, गट क. ३/१ व गट क. ६/१ मधील शेतजमीनीचे सात बारा उतारे प्रकरणात दाखल केलेले आहेत. केवळ सदर सात बारा उता-यांवरून वाद मिळकत हि वडीलोपार्जित असल्याबाबतचा तर्क काढता येत नाही. वादीने सात बारा उता-यांशिवाय फेरफार नोंद क. २२ व २३ देखील प्रकरणात

दाखल केलेले आहे. फेरफार नोंद क. २२ व २३ प्रमाणे गट क. ५/२ व १५/१ मधील शेतजमीन प्रतिवादी क. १ यांना दिनांक ३०. ११.१९७० रोजीच्या वाटणीपत्राप्रमाणे व वारसानुसार मिळाल्याचे दिसुन येते. त्यामुळे सदर गट क. ५/२ मधील शेतजमीन वादी व प्रतिवादी यांची वडीलोपार्जीत शेतजमीन असल्याचे प्रथमदर्शनी निदर्शनास येते. गट क. १५/१ मधील शेतजमीन हि प्रस्तुत दाव्यातील वाद मिळकतीचा भाग नाही. त्यामुळे गट क. १५/१ मधील शेतजमीनीबाबतचे वादी व प्रतिवादी यांचे हक्क संबंध प्रस्तुत अर्ज निकाली काढताना या न्यायालयाच्या विचाराधीन नाहीत.

११. प्रतिवादींतर्फे दाखल करण्यात आलेल्या दिनांक २१.०३. २००६ च्या खरेदीखताप्रमाणे गट क. ३/१ मधील शेतजमीन प्रतिवादी क. २ उषाबाई हिने खरेदीखतान्वये खरेदी केलेली आहे. सदर शेतजमीनीची प्रतिवादी क. २ हि खरेदीखताप्रमाणे संपुर्णपणे मालक झालेली असल्याकारणाने सदर गट क. ३/१ मधील शेतजमीनीमध्ये प्रथमदर्शनी वादीचा काहीही हक्क संबंध दिसुन येत नाही.

१२. प्रतिवादींनी गट क. ६/१ मधील शेतजमीनीबाबत फेरफार नोंद क. ३२ प्रकरणात दाखल केलेली आहे. सदर नोंदीप्रमाणे दत्तक पत्रलेखांन्वये प्रतिवादी क. १ हे मालक झालेले आहेत. सदर मालमत्तेबाबतचे दत्तकपत्रलेख अभिलेखावर उपलब्ध नाही. त्यामुळे त्यातील मजकुराअभावी सदयस्थितीत गट क. ६/१ मधील शेतजमीन ही वडिलोपार्जीत आहे किंवा कसे हे ठरविता येवू शकत नाही.

१३. उपरोक्त विवेचनानुसार वाद मिळकतीतील तीन शेतजमीनींपैकी फक्त गट क्र. ५/२ मधील शेतजमीन हि वारसानुसार प्रतिवादींच्या ताब्यात आल्याचे दिसुन येते. वादी हि प्रतिवादी क्र. १ यांची मुलगी असल्याबाबतचे कथन प्रतिवादींना मान्य आहे. त्यामुळे गट क्र. ५/२ मधील वाद मिळकतीत वादी हिचा प्रथमदर्शनी हक्क आहे. उर्वरीत वाद मिळकत वादी हिने वडीलोपार्जीत असल्याचे व त्यामध्ये तिचा हक्क असल्याचे प्रथमदर्शनी सिध्द केलेले नाही. त्यामुळे अशा परिस्थितीत गट क्र. ३/१ व गट क्र. ६/१ मधील शेतजमीनीबाबत वादीच्या हक्कात मनाई हुकुम दिल्यास प्रतिवादींच्या हक्कास बाधा निर्माण होवू शकते.

१४. एकुणच वादी हिने फक्त गट क्र. ५/२ या वाद मिळकतीत तिचा प्रथमदर्शनी हक्क सिध्द केलेला आहे. गट क्र. ५/२ या वाद मिळकतीत प्रतिवादी यांनी हस्तांतरण अथवा इतर हक्क तयार केल्यास वादीचे निश्चितच अपरिमीत नुकसान होवू शकते व प्रकरणातील गुंतागुंत देखील वाढु शकते. त्यामुळे वादी हिचा अर्ज अंशतः मंजुर करणे रास्त आहे. करीता मी मुद्दा क्र. १ ते ३ चे उत्तरार्थ अंशतः होकारार्थी निष्कर्ष नोंदवून मुद्दा क्र. ४ चे उत्तरार्थ खालील प्रमाणे आदेश पारित करतो.

## <u>आदेश</u>

१. प्रस्तुतचा नि.क्र. ५ चा अर्ज खर्चासह अंशतः मंजुर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांना मौजे निंभा जहाँ. ता. कारंजा जि.

**7** नि.दि.दावा क. ६९/२०२१
मोनिका वि. गोपीचंद व इतर
नि. क. ५ वरील आदेश
CNR No. MHWS070027632021

वाशिम येथील गट क ५/२ मधील शेतजमीनीचे हस्तांतरण करण्यापासुन अथवा इतर व्यक्तींचे हक्कसंबंध निर्माण करण्यापासुन प्रस्तुत दाव्याचा निकाल लागेपर्यंत प्रतिबंधीत करण्यात येते.

Digitally signed by KEDAR KISHOR CHAUDHARI
Date: 2022.05.04 17:47:54 +0530

कारंजा.
दि. ०२/०५/२०२२

(के. के. चौधरी)
प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,
कारंजा (लाड), जि. वाशिम.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/ Order are same word to word as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Steno. | :- | R. A. Charthal (Steno. LG) |
| Court Name | :- | Jt. Civil Judge (Jr.Dn.) and J.M.F.C., Karanja. Dist. Washim. |
| Date | :- | 02/05/2022 |
| Order signed by the presiding officer on | :- | 02/05/2022 |
| Order uploaded on | :- | 02/05/2022 |